## १० वी आणि १२ वी च्या यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !

***विद्यार्थी गुणगौरव, पुरस्कार आणि ज्येष्ठांचे सत्कार याबाबत निवेदन दि. २५ डिसेंबर २०११ रोजी होणाऱ्या भिडे कुलसंमेलनात दर वर्षीप्रमाणे गुणगौरव/ज्येष्ठांचा सत्कार आणि पुरस्कार समारंभ संपन्न होणार आहे. खाली दिलेल्या गटातील निकषांनुसार माहिती ३० सप्टेंबर २०११ पर्यंत खालील पत्त्यावर पाठवावी.***

**सौ. धनश्री श्रीनिवास भिडे** (प्रमुख, विद्यार्थी गुणगौरव योजना)
३, श्रीधर अपार्टमेंट, १२, सीताबाग कॉलनी, सिंहगड रस्ता, पुणे – ४११ ०३०. दूरध्वनी – ९५२०–२४३३७४५५

### विशेष सूचना -

**१) विद्यार्थी गुणगौरव योजनेचा फॉर्म डिसेंबर २००९ च्या अंक ४ मध्ये दिलेला आहे.** त्याची झेरॉक्स प्रत उपयोगात आणली तरी चालेल किंवा **www.bhidekul.in** या आपल्या वेबसाइटवरून तो फॉर्म डाउनलोड करून घ्यावा.

२) अपूर्ण तसेच वरील तारखेनंतर आलेल्या माहितीचा विचार केला जाणार नाही.

३) एका पेक्षा जास्त विद्यार्थ्यांची माहिती पाठवायची असलयास या फॉर्मची झेरॉक्स प्रत उपयोगात आणावी.

४)पारितोषिकासाठी/पुरस्कारासाठी/सत्कारासाठी निवड झालेल्यांना पत्राने किंवा दूरध्वनीद्वारे संपर्क करून कळविले जाईल. त्या करिता आपला संपर्क क्रमांक देणे आवश्यक आहे.

५) पुरस्कारासाठी आपले नामांकन गटानुसार दिलेल्या निकषांप्रमाणे पाठवावे आणि त्या संबंधीच्या झेरॉक्स प्रती जोडाव्यात.

६) जेष्ठांच्या सत्काराकरिता आपले नांव, पत्ता, संपर्क क्रमांक, शिक्षण, व्यवसाय/नोकरी, सामाजिक कार्य व उल्लेखनीय कामगिरी, पारितोषिके इत्यादी माहिती कोऱ्या कागदावर शक्य असल्यास आयकार्ड फोटोसह लिहून पाठवावी.

७) माहिती पाठविणाऱ्यांकडून आयकार्ड साइज फोटो अपेक्षित आहे. शक्य असल्यास पाठविणे.

८) विद्यार्थी गुणगौरव योजनेच्या गटातील निकषांनुसार २०१०–२०११ या वर्षातील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी/विद्यार्थिनींनीच सुवाच्य अक्षरात माहिती पाठवावी.

**गट पहिला** - ४थी व ७वी च्या स्कॉलरशिप परीक्षेत यश मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी (स्कॉलरशिप परीक्षेच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक)

**गट दुसरा** - ५ वी ते ९वी पर्यंतच्या वार्षिक परीक्षेत सर्व तुकड्यात प्रथम क्रमांक मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी मुख्याध्यापकांचे प्रमाणपत्र व गुणपत्रिकेची सत्यप्रत जोडणे आवश्यक.

**गट तिसरा** - दहावीच्या शालांत परीक्षेत ८० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी (शालान्त परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक)

**गट चौथा** - १० वी च्या शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून यशस्वी होणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी (शालान्त परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक) (श्रीमती प्रियंवदा श्रीपाद भिडे, प्रभादेवी, मुंबई. कै. श्रीपाद सखाराम भिडे, यांचे स्मरणार्थ

**गट पाचवा** - १२ वी च्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून यशस्वी होणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी (उच्च माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत जोडणे आवश्यक) डॉ. सौ. शुभदा चारुचंद्र भिडे, सांगली
(कै. के. वि. तथा दादूकाका भिडे, सांगली, यांचे स्मरणार्थ)

**गट सहावा** - १२ वी च्या परीक्षेत शास्त्र शाखेत ८० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे कला शाखेत ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे आणि वाणिज्य शाखेत ७५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी. (उच्च माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत जोडणे आवश्यक)

**गट सातवा** - १० वी च्या शालांत परीक्षेत मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी.
श्री बळवंत दत्तात्रय भिडे, अमळनेर (कै. सिंधू विनायक भिडे, यांचे स्मरणार्थ) (शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक)

**गट आठवा** - १० वी च्या शालांत परीक्षेत संस्कृत विषयात सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी. श्री. जनार्दन कृष्णाजी भिडे, विलेपार्ले, मुंबई, पुरस्कृत (शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक)

**गट नववा** - १० वी च्या शालांत परीक्षेत इंग्रजी विषयात सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थि/विद्यार्थिनी. (सौ. स्नेहा रमेश आपटे (भिडे) पुरस्कृत), त्यांचे वडील, (कै. दत्तात्रय विनायक भिडे, अमळनेर यांचे स्मरणार्थ)
(शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक)

**गट दहावा** - संगीत, नृत्य, नाट्य, गायन, वक्तृत्व आणि क्रीडा अशा विषयात विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनी. सदर प्राविण्य कुठल्या स्तरावर मिळविले आहे, याची माहिती व प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

**गट अकरावा** - विशेष पारितोषिक कै. श्रीकृष्ण भिडे यांच्या स्मृति प्रीत्यर्थ ''साहस/क्रीडा पुरस्कार. या गटात ज्यांना अर्ज करावयाचे असतील त्यांनी आपले नांव, शिक्षण, कौटुंबिक माहिती आणि साहस/क्रीडा प्रकार याची माहिती वेगळ्या कागदावर सुवाच्य हस्ताक्षरात लिहून पाठवावी. या संदर्भात त्यांना मिळालेल्या प्रशस्तिपत्रक/पारितोषिक प्रमाणपत्राची एक सत्यप्रत समवेत जोडावी. श्री. रा. म. भिडे, पुणे (कै. श्रीकृष्ण भिडे स्मृति प्रतिष्ठानचे कै. श्रीकृष्ण भिडे यांचे स्मृति प्रीत्यर्थ)

**गट बारावा** - संगीत, नाट्य, चित्रपट क्षेत्रात खास कामगिरी करणारी खास भिडे व्यक्ती. (श्री. कुमार आणि वसंत विष्णु भिडे, सांगली. यांचे बंधू कै. सुभाष विष्णु भिडे, यांचे स्मरणार्थ)

**गट तेरावा** - सौ. मेधा ऊर्फ अनुराधा अविनाश भिडे, मिरज पुरस्कृत **''आपली सून''** विशेष गौरव पुरस्कार, भिडे कुलातील कुणाचीही पत्नी, आई, अथवा सून यापैकी कुणीही. या पुरस्कारासाठी असलेले निकष खालीलप्रमाणे :– १) सुसंस्कारांचा वारसा सतत पुढे नेण्याचे कार्य सातत्याने करणारी २) विशेष प्राविण्य किंवा विशेष पारितोषिक मिळालेली ३) समाज कार्यात अग्रेसर असणारी ४) अध्यात्मिक क्षेत्रात प्रचारकार्य करणारी ५) लेखन करणारी ६) प्रतिकूल परिस्थितीला तोंड देऊन मुलांसाठी विशेष धडपड करणारी. वरीलपैकी कोणत्याही एक वा अनेक प्रकारे कार्य यशस्वीपणे करणाऱ्या स्त्री चे नामांकन, आई, पत्नी वा सुनेच्या गौरवासाठी घरातील पुरुष मंडळींनी पुढाकार घेऊन प्रतिष्ठानकडे आपणहून नाव सुचवावे.

**गट चौदावा** - विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी मदत योजना : इरावती ट्रस्ट, दादर मुंबई यांच्या प्रमुख श्रीमती सुमित्र मधुसूदन भिडे यांनी कै. त्रिंबक राजेश्वर भिडे आणि कै. जानकीबाई त्रिंबक भिडे यांचे स्मरणार्थ पुरस्कृत केलेली विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी मदत योजना खालीलप्रमाणे . . .

आर्थिक परिस्थितीमुळे अडचणीत असणाऱ्या कोणत्याही गुणवान, अभियांत्रिकी किंवा आर्किटेक्ट शाखेत शिक्षण घेत असलेल्या, भिडे कुलातील विद्यार्थी/विद्यार्थिनीला दरवर्षी सहाय्य देण्यासाठी पारितोषिक /मदतीची योजना आहे.

**❖ ७५ वर्षे किंवा त्यावरील सत्कारार्थी ज्येष्ठ कुलबंधू/भगिनी/माहेरवाशिणींनी फोटोसह माहिती पाठवावी ❖**